## निसर्गभ्रमंतीत वास्तव उघड : लांडोरखोरीच्या विकासासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प

# मेहरुण तलावाचे दोन जलस्त्रोत गायब

जळगाव : बेसुमार बांधकामे आणि अतिक्रमणांमुळे मेहरुण तलावाचे दोन प्रमुख नैसर्गिक जलस्त्रोत गायब झाले आहे. यामुळे तलाव परिसरातील वन्यजीवांचा अधिवास बाधित झाला आहे. परिणामी आता नव्याने जलस्त्रोत विकसित करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याचा सूर पर्यावरप्रेमींकडून उमटला.



निसर्गभ्रमंतीदरम्यान लांडोरखोरीला पर्यावरणवाद्यांनी भेट दिली व परिसराची पाहणी केली.

मेहरुण तलावाला गतवैभव मिळवून देण्यासाठी भविष्यात चळवळ उभी केली जाईल तसेच लांडोरखोरीच्या विकासासाठी कार्यक्रम हाती घेतला जाईल, असा संकल्प पर्यावरणवाद्यांनी शुक्रवारी केला.

वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत लांडोरखोरी येथे निसर्गभ्रमंती या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात शहरातील पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सकाळी सहा ते आठ दरम्यान भ्रमंती करण्यात आली.

वन्यजीव अभ्यासक अभय उजागरे आणि पक्षीअभ्यासक गणेश सोनार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

राजेंद्र नन्नवरे, रवींद्र सोनवणे, वासुदेव वाढे, उमेश पाटील, जतिन श्रीवास्तव, सदाशिव महाजन, गिरीश कुळकर्णी, चेतना नन्नवरे, केशर उपाध्ये, इम्रान तडवी आदींनी या उपक्रमात सहभाग घेतला. जवळपास पाच कि.मी. परिसरात या पर्यावरणवाद्यांनी भ्रमंती केली.

### नवीन स्त्रोतांचा घ्यावा शोध

मेहरुण तलावाला नैसर्गिक पाण्याचा पुरवठा करणारे जलस्त्रोत परिसरातील मानवी अतिक्रमणांमुळे लुप्त झाले आहेत. यात शिरसोली आणि मोहाडीकडून येणाऱ्या दोन जलस्त्रोतांचा समावेश असल्याचे अभय उजागरे यांनी यावेळी सांगितले.

मेहरुण तलावाच्या संवर्धन आणि विकासाकरिता पर्यावरणवाद्यांनी घेतलेली आक्रमकता आणि वेळोवळी केलेला पाठपुरावा यामुळे सध्या तलाव टिकून आहे, असे मतही व्यक्त झाले.

तलाव आणि येथील जैव विविधतेच्या विकासाकरिता नवीन जलस्त्रोतांची पाहणी करुन ते शोधले गेले पाहिजे आणि त्यांचा विकास करण्यात आला पाहिजे, असा ठराव यावेळी सर्वानुमते करण्यात आला.

### टॉवरवरुन निरीक्षण

निसर्गभ्रमंतीला लांडोरखोरीच्या ६५ हेक्टरच्या वनापासून सुरुवात करण्यात आली. पहिल्या ट्रॅकमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. लांडोरखोरीची चारही बाजूने भटकंती केल्यानंतर सर्वजण वन विभागाच्या वॉचिंग टॉवरवर पोहोचले. तेथून त्यांनी संपूर्ण परिसराची पाहणी केली. दरम्यान उपस्थितांनी लांडोरखोरीच्या वनातील वन्यप्राण्यांची देखील माहिती घेतली.

### शहराची फुफ्फुसे असुरक्षित

◆ शिवाजी उद्यान, मेहरुण तलाव आणि लांडोरखोरीचे वन हे शहराची फुफ्फुसे आहेत. शहराला निसर्गाने दिलेला हा हरीत पट्टा सध्या प्रशासन आणि नागरिकांमुळे धोक्यात सापडला आहे. येथील वन्यजीवन आणि जैव विविधता असुरक्षित असून तिच्या संवर्धन आणि विकासाकरिता आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजे, असे मत राजेंद्र नन्नवरे यांनी यावेळी व्यक्त केले.

### संचार मार्गाचा पर्याय

लांडोरखोरी येथून वन्यजीव पाण्याच्या शोधात मेहरुण तलावाकडे येतात. त्यामुळे लांडोरखोरी आणि मेहरुण तलाव यांना जोडणारा संचार मार्ग विकसित करण्यात आला पाहिजे. तरच या क्षेत्रात वन्यजीवांचा अधिवास वाढेल, अशी सूचना गणेश सोनार यांनी मांडली.

### माहितीपटांचे प्रदर्शन

◆ वसुंधरा महोत्सवांतर्गत विविध माहितीपट आणि लघुपट दाखविले जात आहेत. शुक्रवारी प्लांटस, लाख मोलाची गोष्ट, माय नेम इज ग्रीन, बॅग इट अ‍ॅण्ड बीन इट, शिवालीक, मान्सून नॉर्थ इस्टर्न डायरीज, वाईल्ड डॉग, पॉइझन ऑन द प्लॅटर, क्लायमेट चेंज, रिटर्न ऑफ द क्लाऊडेड लिओपार्ड, भवताल, भिमाशंकर, हाऊ प्लॅस्टिक रिसायकल, वेस्टेड हे चित्रपट दाखविण्यात आले. शनिवारीही चित्रपटांचे प्रदर्शन केले जाणार आहेत. महाविद्यालयांमध्ये सकाळी १० ते १२ तर कांताई सभागृह येथे सायंकाळी ६.३० ते ८.३० दरम्यान चित्रपट दाखविले जाणार आहेत.

### प्लांट्सने वेधले लक्ष

◆ शुक्रवारी कांताई सभागृहात प्लांट्स, पॉइझन ऑन द प्लॅटर व देअर इज इलेव्हन अव्हर हे तीन माहितीपट प्रेक्षकांना दाखविण्यात आले. वनस्पतींचा जीवन क्रम आणि त्यांचे पर्यावरणीय महत्त्व दाखविण्यात आलेल्या प्लांट्स या चित्रपटांचे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. शनिवारपर्यंत हे प्रदर्शन सुरु राहणार असून नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.